जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2025 लोकमत

# विद्यापीठात पणदूरकर अभ्यासिकेचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वेदनेच्या हुंकारावर दातृत्वाच्या फुंकरीने सृजनाचा अंकुर फुलल्याचे दृश्य शिवाजी विद्यापीठात 'डॉ. ॲड. कै. रूपाली पणदूरकर अभ्यासिका'च्या उद्घाटन समारंभाच्या निमित्ताने अनुभवता आले.

विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. ॲड. रामचंद्र पणदूरकर आणि त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी त्यांच्या दिवंगत कन्या डॉ. ॲड. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठास दोन टप्प्यांमध्ये ६० लाख रुपयांचा निधी दिला. त्या निधीमधून 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थिनींच्या वसतिगृह परिसरात उभारलेल्या दुमजली अभ्यासिका इमारतीच्या कोनशिला अनावरण हेमकिरण पणदूरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. डॉ. पणदूरकर यांनी डॉ. रूपाली यांच्या आठवणींना उजाळा दिला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी 'कमवा व शिका' योजनेतून अभ्यास करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविणाऱ्या राधिका जवळे, महेश साळुंखे, रवी पाटील, संतोष शेखर आणि सुरेश जगताप यांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी वसतिगृह अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. दीपक भादले, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.



विद्यापीठात डॉ. ॲड. कै. रूपाली पणदूरकर अभ्यासिकेच्या कोनशिला अनावरणप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. रामचंद्र पणदूरकर, हेमकिरण पणदूरकर उपस्थित होते.

27 FEB 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नाट्यशास्त्र'ची 'शिवस्पंदन'मध्ये विजयाची हॅट्ट्रिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात सलग तिसऱ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवित संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने हॅट्ट्रिक नोंदविली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवस्पंदन महोत्सवाचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी शोभायात्रेसह एकल नृत्य, नकला, रांगोळी, स्थळचित्रण, सुगम गायन, लघुनाटिका, भारतीय समूहगीत आणि समूहनृत्य प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवित सर्वसाधारण विजेतेपदावर सलग तिसऱ्यांदा आपले नाव कोरले. महोत्सवात अखेरच्या दिवशी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात एकल नृत्य आणि समूहनृत्य स्पर्धा पार पडल्या.

## स्पर्धेचा निकाल असा

**शोभायात्रा** - प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : राज्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, उत्तेजनार्थ १: भूगोल अधिविभाग, उत्तेजनार्थ २ : मास कम्युनिकेशन अधिविभाग **लोकवाद्यवादन (एकल)** - प्रथम : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभाग, द्वितीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ १ : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, उत्तेजनार्थ २ : तंत्रज्ञान अधिविभाग

**एकल नृत्य** - प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : राज्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ १: संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ २ : रसायनशास्त्र अधिविभाग

**नकला** - प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : एम.बी.ए. अधिविभाग, तृतीय : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, उत्तेजनार्थ : पर्यावरणशास्त्र अधिविभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2025

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात लावणी नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थिनींसमवेत पोलंडचे युवक-युवती. (छाया : मिलन मकानदार)

# पोलंडच्या तरुणाईने जिंकली मने

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पोलंडच्या युवक-युवतींनी शिवाजी विद्यापीठाच्या युवा कलाकारांसमवेत लावणी नृत्यात घेतलेला सहभाग पाहून सारेच चकित झाले व आनंदलेही. या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. पोलंड देशाचे युवा शिष्टमंडळ कोल्हापूरमध्ये आले असून, त्यांनी या भेटीअंतर्गत सोमवारी विद्यापीठास भेट दिली. राजर्षी शाहू सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात एक विद्यार्थिनी लावणी सादर करत असताना शिष्टमंडळातील काही कलाकार तिच्या नृत्यात सामील झाले. त्यांच्या या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने त्यांनी जिंकून घेतली.

उपस्थित भारतीय विद्यार्थ्यांशी शिष्टमंडळातील तरुणाईने संवाद साधला. पोलंडचे भारताशी भावनिक नाते असून, या दोन्ही देशांत बरेचसे सांस्कृतिक साम्य असल्याचे युवकांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी शिष्टमंडळातील विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी प्रास्ताविक केले.

सहायक कक्ष अधिकारी कपिल कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रोहित आनंद, भरत चव्हाण उपस्थित होते. पोलंडच्या शिष्टमंडळात हेलेना कॅटरझिना, सँड्रा सॅनियर, पीटर डॅनिकी, मिया स्प्लिट, ओलीविया कोलासा, जाकूब सेरेडेनस्की, अन्टोनी सेरेडेनस्की, वॅरोनिका वॅलूपिक, वॅरोनिका ड्रोड, कॉन्स्टॅन्टी क्सूबिकी, डॉमिनिकी गिझीकी, पॅटरिझा चोडोरोवॅस्का आदींचा समावेश होता. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2025
Times of India

# SUK's Shivspandan fest ends with vibrant celebrations

TOI



Foreign students perform their traditional dance

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The three-day 'Shivspandan' cultural festival organized by Shivaji University's Student Development Board concluded on a high note on Tuesday. The event featured a range of cultural competitions, including folk music, folk dance, mime, skits, drama, classical singing, group singing, and rangoli, all held on the SUK premises. The festival wrapped up in the presence of vice-chancellor Dr D T Shirke, pro vice-chancellor Dr Pramod Patil, along with other dignitaries and students.

A key highlight of the event was the musical festival, where various traditional folk instruments were showcased.

The festival began on Sunday with a colourful procession rally. The procession highlighted several important themes like rural and agricultural culture, film shooting, the eradication of child labor, tobacco consumption and cancer, the importance of Yoga-Pranayam, social harmony, and the elimination of female foeticide, all presented by the students.

A youth delegation from Poland, currently on an educational-cultural tour of India to honor their forefathers who sought refuge in Valiwade, Kolhapur, during the Second World War, visited Shivaji University on Tuesday. During their visit, the delegation interacted with students from various departments and the National Service Scheme.

A cultural program was held for the visiting delegation, and when Lavani, a traditional folk dance of Maharashtra, was performed, several members of the Polish delegation couldn't resist joining in the dance and learning some Lavani dance steps.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 FEB 2025
लोकमत




शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन महोत्सवात विद्यार्थ्यांनी दीपनृत्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधले.

26 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लावणी नृत्याने पोलंडच्या तरुणाईने जिंकली मने

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा लावणी हा नृत्यप्रकार पाहण्यास जितका सोपा, सादरीकरणास मात्र तितकाच अवघड. त्यातली नजाकत, अदाकारी, ठेका हे सारेच वेगळे; मात्र पोलंडच्या युवक-युवतींनी शिवाजी विद्यापीठाच्या युवा कलाकारांसमवेत लावणी नृत्यात घेतलेला सहभाग पाहून सारेच चकीत झाले अन् आनंदलेही. या सादरीकरणाने त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.




पोलंड या देशाचे युवा शिष्टमंडळ सध्या भारताच्या शैक्षणिक-सांस्कृतिक दौऱ्यावर आहे. वळीवडेसह कोल्हापूर परिसरातील आपल्या पूर्वजांच्या स्मृती जागवण्यासाठी, त्यांच्याप्रती आदरांजली वाहण्यासाठी पोलंडच्या राजशिष्टाचार अधिकाऱ्यांसह नागरिक अतिशय भावनापूर्ण आत्मियतेने येथे येत असतात. यंदाही २१ युवक-युवतींचे शिष्टमंडळ कोल्हापूरमध्ये आले असून, त्यांनी या भेटीअंतर्गत सोमवार, दि. २४ रोजी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन राष्ट्रीय सेवा योजनेसह विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने काही सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यावेळी एक विद्यार्थिनी लावणी नृत्य सादर करत असताना शिष्टमंडळातील काही कलाकार तिच्या नृत्यात सामील झाले. तिच्याप्रमाणे लावणी करण्याचा त्यांनी अत्यंत यशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या या सहनृत्याविष्काराने सर्वच उपस्थितांची मने त्यांनी जिंकून घेतली. या संवादानंतर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही शिष्टमंडळातील विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहायक कक्ष अधिकारी कपिल कुमार यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी रोहित आनंद, भरत चव्हाण उपस्थित होते. पोलंडच्या शिष्टमंडळात हेलेना कॅटरझिना, सँड्रा सॅनियर, पिटर डॅनिकी, मिया स्प्लिट, ओलीविया कोलासा, जाकूब सेरेडेनस्की, अन्टोनी सेरेडेनस्की, वॅरोनिका वॅलूपिक, वॅरोनिका ड्रोड, कॉन्स्टॅन्टी क्सूबिकी, डॉमिनिकी गिझिकी, पॅटरिझा चोडोरोवॉस्का आदींचा समावेश होता. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2025

सकाळ



कोल्हापूर : सायबर ट्रस्ट संचलित महाविद्यालयातील पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. अजितसिंह जाधव यांनी दीपप्रज्वलन केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# विकास साधण्यासाठी टीमवर्क महत्त्वाचे : अजितसिंह जाधव

कोल्हापूर, ता. २६ : घर, समाज आणि देशाचा विकास होण्यासाठी टीमवर्क महत्त्वाचे आहे. वडीलधाऱ्यांचा, गुरुजनांचा मान राखा आणि चांगला मित्र परिवार जोडा. आपल्या जीवनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या गोष्टींचा अवलंब करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

सायबर ट्रस्ट संचलित कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमेनमध्ये पारितोषिक वितरण आणि वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्यात ते बोलत होते. डॉ. जाधव यांनी नवीन पिढीने कशाप्रकारे स्वतःचा व्यक्तिमत्त्व विकास करून आपले ध्येय कसे गाठावे, याबद्दल मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांनी महाविद्यालयातील वर्षभरातील सर्व उपक्रमांचा आढावा सादर केला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध उपक्रम, क्रीडा स्पर्धांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. मृणालिनी शिंगे यांनी स्वागत केले. साक्षी देसाई यांनी आभार मानले. वार्षिक स्नेहसंमेलनात विविध बेचाळीस सांस्कृतिक कार्यक्रमांचे विद्यार्थिनींनी उत्साहात सादरीकरण केले. यावेळी श्वेता पाटील, रामेश्वरी गुंजीकर, प्रीती गरगटे, नीलम जिरागे, प्रज्ञा कापडी, सीमा पाटील, प्रियांका चव्हाण आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2025

सकाळ

# उद्योजकतेवर राष्ट्रीय परिषद आजपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे 'उद्योजकतेला प्रोत्साहन आणि सामाजिक समावेशन' या विषयावर गुरुवारपासून दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन सकाळी अकरा वाजता पुणे येथील सुहास पालेकर यांच्या बीजभाषणाने होईल. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या या परिषदेस देशभरातून प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक उपस्थित राहणार आहेत. ते उद्योजकता विकास, उद्योजकता विकासास पूरक संस्था व आवश्यक वातावरण निर्मिती, महिलांसाठी उद्योजकता विकास, उद्योजकतेद्वारे सामाजिक समावेशन, शिक्षण आणि कौशल्य विकास, आदी विषयांवर शोधनिबंध सादर करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे दि. २७ व २८ फेब्रुवारी रोजी 'उद्योजकतेला प्रोत्साहन आणि सामाजिक समावेशन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन दि. २७ रोजी सुहास पालेकर, पुणे यांच्या बीजभाषणाने होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के असणार आहेत. परिषदेस देशभरातून प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक उपस्थित राहणार आहेत. परिषदेचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये करण्यात आले आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज उद्योजकता परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्यावतीने आज (दि. २७) सकाळी ११ वाजता 'उद्योजकतेला प्रोत्साहन आणि सामाजिक समावेशन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन पुण्यातील सुहास पालेकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत. २८ फेब्रुवारी रोजी परिषदेची सांगता होणार आहे. तरी या राष्ट्रीय परिषदेस प्राध्यापक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

2 7 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पश्चिम महाराष्ट्रातील चाळीस बोलींचे संवर्धन

- शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागात बोलींचा अभ्यास
- जिल्ह्यातील चंदगडी बोली आता पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात आज पश्चिम महाराष्ट्रातील ४० बोलीभाषांचा अभ्यास केला जात आहे. जिल्ह्यातील विशेषत: चंदगडी ही मराठीतील वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे. यावर डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोपाळ गावडे यांनी पुस्तके लिहिली. ज्येष्ठ साहित्यिक गणेश देवींच्या प्रकल्पामुळे चंदगडी बोलीचा युजीसीने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात समावेश केला आहे. गुरुवारी, २७ रोजी मराठी भाषा गौरव दिन आहे. यानिमित्त चंदगडी बोलीला मिळालेली प्रतिष्ठा महत्वपूर्ण आहे.

विद्यापीठात मराठी अधिविभागाची स्थापना १९७९ साली झाली. गेल्या ४५ वर्षात विभागात बोलीभाषांवर अभ्यास सुरू आहे. कोल्हापुरात सीमा भागातील सर्व प्रदेशातील बोलीभाषा, गोसावी, नंदिवाले, वडर, कैकाडी, कोरवी समाजासह तंजावर, गोवा, मॉरिशसमधील मराठी बोलीवर प्रकाश टाकला आहे. मराठी समुहांच्या, कापड व्यापाऱ्यांची कोड लँग्वेज, मातंग समाजातील पारोसी बोलीचाही अभ्यास केला जात आहे. कारण मराठी भाषेचे अस्तित्व आणि महत्व हे या बोलीभाषां अवलंबून आहे.




चंदगडी भाषेवर कुडाळी, इंग्रजी, पोर्तुगीज, शिवकालीन, कोकणी भाषेचा प्रभाव आहे. चंदगडी ही दोन लाख लोकांची बोलीभाषा आहे. येथील लोकांशिवाय ती इतरांना कळू शकत नाही. विभागात चंदगडी भाषेवर अभ्यास झाल्याने ऱ्हास होत चाललेल्या या बोलीला प्रतिष्ठा मिळाली. चंदगडी भाषेचा अभ्यासक्रमात समावेश झाल्याने, आपली बोली महत्वाची असल्याची जाणीव तरूणाईला झाली. त्यामुळे चंदगडी संस्कृतीचे दर्शन सोशल मिडियावर होत आहे. विभागात सर्व बोलीभाषांचा अभ्यास होत असल्याने मराठी विभाग राज्यभरातील विद्यापीठांमध्ये अग्रेसर आहे.

साहित्यिक रणजीत देसाई, शिवाजी सावंत, राजन गवस, कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातील कोल्हापुरी भाषेचा अभ्यास अनेक संशोधकांनी केला आहे. विशेषत: खोत यांच्या कादंबरीतील पन्हाळगडाच्या पायथ्याशी वापरल्या जाणाऱ्या बोलींचाही लेखक, समीक्षकांनी अभ्यास केला आहे. डॉ. रणधीर शिंदे यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, लोकशाहीर अण्णाभाऊंच्या भाषेबद्दल लेखन करून मराठीच्या सौंदर्यात भर घातली आहे.

**तरुण भारत अँकर**

### हे अभ्यासक करतात भाषांवर संशोधन

सुमन बेलवलकर यांनी लीळाचरित्रातील समाजदर्शन याचा अभ्यास केला, सध्या प्रांजली क्षीरसागर या भाषेची उत्पती, शोध, उगम व वाटचाल', हिना दळवी या 'महाराष्ट्र–कर्नाटक सीमाभागातील भाषा'वर तर शीतल पटले 'नंदुरबार परिसरातील पावरी बोली'वर संशोधन करत आहेत.

### सोशल मीडिया मुक्त व्यासपीठ

मराठीतील बोलीभाषा तंत्रज्ञानामुळे सुलभ होत आहे. सोशल मीडियावर बोली लेखन, चिन्ह, ध्वनी रूपात राज्य करत आहेत. सोशल मीडियामुळे बोली भाषेचे लोकशाहीकरण झाले आहे. काळानुसार वाडी–वस्तीपासून ते उच्च पदस्थांपर्यंत सोशल मिडिया हे भावनाविष्कार करण्याचे मुक्त व्यासपीठ बनले आहे.



### लोकसंस्कृतीतून भाषेचे संवर्धन


चंदगडीसह पश्चिम महाराष्ट्रातील बोलीभाषेत पाळणा, लोकगीत, लग्नातील गाणी, दिवाळी, गौरी–गणपती, हादग्याच्या गीतांमधून बोलीचे संवर्धन केले जात आहे. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने बोलीभाषेची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळाली आहे. बोलीभाषेचा जास्तीत जास्त अभ्यास होण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

**– डॉ. नंदकुमार मोरे, अधिविभागप्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ**

### बोलीभाषेच्या अभ्यासातून महत्व वाढते

प्राचीन व आधुनिक मराठी साहित्यातील भाषा वाटचालीचा अभ्यास केला जात आहे. बोलीभाषांच्या अभ्यासातून त्या त्या भाषांना महत्व प्राप्त होते. मराठीच्या वाटचालीचा शोध घेण्यासाठी बोलीभाषांचा अभ्यास महत्वपूर्ण आहे.

**– डॉ. रणधीर शिंदे, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ**



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2025
लोकमत

# विद्यापीठात राष्ट्रीय परिषद आजपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने २७ व २८ फेब्रुवारीस 'उद्योजकतेला प्रोत्साहन आणि सामाजिक समावेशन' या विषयावर मानव्यशास्त्र सभागृहामध्ये राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेचे उदघाटन आज, गुरुवारी सुहास पालेकर यांच्या बीजभाषणाने होणार असून, कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. या राष्ट्रीय परिषदेस देशभरातून प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेस प्राध्यापक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.